

सावईवेरे, वळवई भागात झाडे कोसळून घरांचे नुकसान पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



मुंबई इंडियन्सची प्लेऑफमध्ये दमदार एन्ट्री पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २३ मे २०२५ I पाने ४ I ₹ ४ I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 260 I Verna, I facebook.com/dainikherald I Friday 23 May 2025 I Pages 4 I ₹ 4

# भारत-पाक युद्धविरामात ट्रम्प यांची मध्यस्थी नाही - जयशंकर

■ नवी दिल्ली, दि. २२ :

**भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी स्पष्ट केले आहे की भारत आणि पाकिस्तानमधील अलीकडील संघर्ष परस्परसंमतीने संपविण्यात आला असून, या प्रक्रियेत कोणत्याही तृतीय पक्षाचा, विशेषतः अमेरिकेचा, सहभाग नव्हता.**




नेदरलँड्सची सार्वजनिक प्रसारण वाहिनी एनओएस ला दिलेल्या मुलाखतीत जयशंकर यांनी सांगितले की, संघर्षाच्या दरम्यान अनेक देशांनी चिंता व्यक्त केली, मात्र युद्धविरामाबाबतचा निर्णय हा दोन्ही देशांदरम्यान थेट चर्चेतून घेण्यात आला.

जयशंकर २० व २१ मे रोजी डेन्मार्कच्या दौऱ्यावर असताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, पाकिस्तानकडून १० मे रोजी लष्करी स्तरावर युद्धबंदीचा प्रस्ताव आला होता आणि त्यानंतरच गोळीबार थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

जगातील कोणताही देश जेव्हा दोन देशांमध्ये संघर्ष सुरू असतो, तेव्हा संपर्क साधतो हे स्वाभाविक आहे. मात्र युद्ध थांबवण्याचा निर्णय भारत आणि पाकिस्तान यांच्यात थेट संवादातून झाला, असे जयशंकर यांनी नमूद केले.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वी असा दावा केला होता की, त्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धविराम घडवून आणण्यासाठी भूमिका बजावली. या दाव्याला उत्तर देताना जयशंकर म्हणाले की , आम्ही अमेरिकेसह इतर सर्व संबंधित देशांना स्पष्टपणे सांगितले होते की, जर पाकिस्तानला संघर्ष थांबवायचा असेल, तर त्यांना आमच्याशी थेट संपर्क साधावा लागेल. त्यांच्या लष्करप्रमुखाने आमच्या लष्करप्रमुखाशी बोलावे लागेल , आणि नेमकं तेच घडलं.जयशंकर पुढे म्हणाले की, पाकिस्तानी लष्कराने गोळीबार थांबवण्याची तयारी दर्शवली आणि भारताने त्यानुसार प्रतिसाद दिला

दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानला सूचित केल्याच्या विधानावर भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टीकरण दिले आहे.

गुरुवारी झालेल्या साप्ताहिक पत्रकार परिषदेत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांना यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला. एका पत्रकाराने विचारले की, हल्ल्यापूर्वी पाकिस्तानला कोणतीही माहिती देण्यात आली होती का? त्यावर जयस्वाल यांनी स्पष्टपणे उत्तर दिले की,आम्ही पाकिस्तानला पान २ ▶

## भारत - पाक तणाव कायम

**भारत आणि पाकिस्तानमधील संबंधांमध्ये तणाव कायम आहे. पाकिस्तानने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातील एका कर्मचाऱ्याला देश सोडण्यास सांगितले आहे.संबंधित भारतीय कर्मचाऱ्याला २४ तासांच्या आत पाकिस्तान सोडण्यास सांगण्यात आले आहे. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय उच्चायुक्तालयाच्या चार्ज डी अफेअर्सना बोलावून या निर्णयाची माहिती दिली.यापूर्वी २१ मे रोजी भारत सरकारने पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील आणखी एका अधिकाऱ्याला 'अवांछित व्यक्ती' म्हणून घोषित केले होते.भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या प्रेस रिलीजनुसार, पाकिस्तान उच्चायुक्तालयाला भारतातील कोणताही पाकिस्तानी राजदूत किंवा अधिकारी त्याच्या विशेषाधिकारांचा आणि दर्जाचा कोणत्याही प्रकारे गैरवापर करणार नाही याची खात्री करण्यास सांगण्यात आले आहे.**

## निवडक

### 'नो ट्रेड, नो टॉक, आता फक्त पीओकेवरच...' : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, दि. २२ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानला स्पष्ट इशारा दिला आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे मोठा धक्का दिल्यानंतर, पंतप्रधान मोदींनी सीमावर्ती जिल्ह्यात झालेल्या जाहीर सभेद्वारे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना कडवट संदेश दिला आहे. मोदी म्हणाले की, 'पाकिस्तानसोबत ना व्यापार होणार आहे ना कोणती चर्चा. आता चर्चा होणार असेल तर ती फक्त पाकव्याप्त काश्मीर म्हणजेच पीओकेबद्दल असेल.

पंतप्रधानांनी राजस्थानातील बिकानेरमध्ये केलेल्या भाषणात पाकिस्तान आणि दहशतवादाच्या मुद्द्यांवर भर दिला. दहशतवादावर कडक भूमिका घेत पंतप्रधान मोदी म्हणाले की, जर आता भारतात कोणतीही दहशतवादी घटना घडली तर भारत दहशतवाद्यांना आणि दहशतवादाला आश्रय देणाऱ्या सरकारला स्वतंत्र घटक म्हणून पाहणार नाही. यावेळी, पंतप्रधानांनी जगाला स्पष्ट संदेश दिला की दहशतवादाविरुद्ध भारताने घेतलेल्या निर्णयांमध्ये कोणत्याही देशाचा हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही.

### अमेरिकेत दहशतवादी हल्ला

**वॉशिंग्टन, दि. २२ :** अमेरिकेतील इस्त्रायली दूतावासातील दोन कर्मचाऱ्यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. वॉशिंग्टन डीसीमधील कॅपिटल ज्यू म्युझियमजवळ ही घटना घडल्याची माहिती आहे. या घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून तपास सुरू केला आहे. सध्या पोलिसांकडून संशयिताचा शोध सुरू आहे.

अमेरिकेत वाढत्या इस्त्रायल-पॅलेस्टाईन वादाच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडली आहे, ज्यामुळे ज्यू समाजात भीतीचे वातावरण निर्माण झालं आहे.

बुधवारी (२१ मे) रात्री कॅपिटल ज्यू म्युझियमजवळ वॉशिंग्टन डीसीमधील इस्त्रायली दूतावासातील दोन कर्मचाऱ्यांची हत्या करण्यात आल्याचे होमलँड सिक्युरिटी सेक्रेटरी क्रिस्टी नोएम यांनी सांगितलं. जवळजवळ एक वर्षापासून सुरु असलेल्या पॅलेस्टिनी समर्थकांचं निदर्शन आणि इस्त्रायलविरोधानंतर अमेरिकेत अशी ही पहिलीच घटना घडली आहे.

# मनोहर पर्रिकर इनडोअर स्टेडियममध्ये गळती सुरूच

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**मडगाव, दि. २२:** नावेली येथील मनोहर पर्रिकर इनडोअर स्टेडियममधील छतावरील गळतीच्या समस्येने पुन्हा एकदा डोके वर काढले असून, क्रीडा उपक्रमांमध्ये व्यत्यय निर्माण होत आहे. स्टेडियमच्या एक्झॉस्ट फॅनच्या भोवतालच्या भागातून होणाऱ्या सततच्या गळतीमुळे खेळाडूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सद्यस्थितीत सुरु असलेल्या पावसामुळे स्टेडियममधील पायाभूत सुविधांची असुरक्षितता पुन्हा अधोरेखित झाली आहे. छतावरील झिरपणाऱ्या पाण्यामुळे लाकडी कोर्टवर डबकी तयार होत असून, खेळादरम्यान अपघाताची शक्यता वाढली आहे. गुरुवारी स्टेडियममध्ये दौरा घेतल्यावर पाणी पकडण्यासाठी जमिनीवर ठेवलेल्या बादल्या सहजपणे दिसून आल्या.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, गळती ही मुख्यतः छतावरील एक्झॉस्ट फॅनच्या आजूबाजूच्या परिसरातून होत आहे. ही समस्या मागील काही वर्षांपासून सुरू असून, वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणताही कायमस्वरूपी उपाय योजण्यात आलेला नाही. त्यामुळे स्थानिक खेळाडू आणि हितसंबंधीतांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

स्टेडियममधील लाकडी कोर्ट , जे आयात करून बसवण्यात आले आहे , पाणी साचल्यामुळे अधिक झपाट्याने खराब होत आहे. पृष्ठभाग वाकडा होऊन त्याचा खेळावर आणि खेळाडूंवर विपरीत परिणाम होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

लाकडी कोर्ट अत्यंत महाग आहे. पाण्यामुळे ते वाकडे झाल्यास त्याची दुरुस्ती शक्यच नसते. त्यामुळे अशा सुविधा जपून ठेवणे आवश्यक आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते सॅव्हियो कुतिन्हो यांनी व्यक्त केले.

आरटीआय (माहितीचा अधिकार) अंतर्गत करण्यात आलेल्या एका अर्जाला दिलेल्या उत्तरात प्रशासनाने मान्य केले आहे की, २०२४ च्या पावसाळ्यातही गळतीची समस्या नोंदवण्यात आली होती. त्या वेळी छतावरील एक्झॉस्ट फॅनमुळे गळती होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले होते.

यावर तात्पुरता उपाय म्हणून १६,५०० रुपयांच्या खर्चातून पीव्हीसी गटार बसवण्यात आले होते. या उपायाचा काहीसा सकारात्मक परिणाम दिसून आल्याने संपूर्ण छतावरील एक्झॉस्ट फॅनसाठी अशीच दुरुस्ती करण्यासाठी सुमारे ४.९६ लाख रुपयांचा खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यात आला. पान २ ▶

## गळतीप्रकरणी अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस

**इनडोअर स्टेडियम'मध्ये पाणी गळत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर एका वकिलाने संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. या समस्येवर तात्काळ उपाय न झाल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला असून, त्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.स्थानिक रहिवासी आणि स्टेडियमचे नियमित वापरकर्ते यांच्या वतीने ही नोटीस क्रीडा संचालक, गोवा क्रीडा प्राधिकरणाचे कार्यकारी संचालक तसेच गोव्याचे क्रीडामंत्री यांच्याकडे पाठवण्यात आली आहे. या नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, जर दिलेल्या मुदतीत आवश्यक ती दुरुस्ती व दुरुस्तीसंबंधी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात रिट याचिका दाखल केली जाईल.सदर प्रकरणावर गेल्या वर्षभरापासून अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यात आले होते, मात्र अद्याप ठोस कृती करण्यात आलेली नाही, असा आरोपही या नोटीसमध्ये करण्यात आला आहे.**

# मुसळधार पावसाचा जोर कायम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २२ :** राजधानी पणजी व परिसरात गुरुवारीही पावसाचा जोर कायम राहिला. मुसळधार सरीमुळे जनजीवनावर परिणाम होत आहे. विविध भागांमध्ये झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या असून, काही वाहनांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, हवामान विभागाने आगामी काही दिवसांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे.

चिंबल येथील इंदिरा नगर भागात गुरुवारी सकाळी एका नारळाच्या झाडाने पार्क करून ठेवलेल्या वाहनांवर आदळून मोठे नुकसान केले. या घटनेत चार जण सहभागी होते. त्यापैकी दोन वाहनांचे नुकसान झाले, एक जण किरकोळ जखमी झाला, तर एकास कोणतीही इजा झाली नाही.कळंगुटच्या खोब्रावाडो परिसरात एका मोठ्या आंब्याच्या झाडाने पाच गाड्यांना चिरडले. या घटनेमुळे स्थानिकांत घबराट पसरली. पणजी पोलिस व अग्निशमन व आपत्कालीन सेवांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि झाड हटवण्याचे काम हाती घेतले.सततच्या पावसामुळे आणि त्यातून होणाऱ्या अधिवास बदलामुळे ब्रिटोना येथील कोएल्होवाडो भागात एका घरासमोर मगर दिसून आली. स्थानिकांनी तात्काळ वन विभागाला माहिती दिली. विभागाच्या पथकाने योग्य ती काळजी घेत मगरीला सुरक्षितरित्या पान २ ▶

# २४ तासांच्या आत 'फाल्कन' परिसर रिकामा करा !

## महानगरपालिकेने बजावले १३ दुकानांना तातडीचे आदेश

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**पणजी, दि. २२ :** पणजी महानगरपालिकेने म्युनिसिपल मार्केटजवळील 'फाल्कन' इमारतीलगत असलेल्या १३ दुकानांना २४ तासांच्या आत परिसर रिकामा करण्याचे आदेश देत अधिकृत नोटीस बजावली आहे.

ही कारवाई गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाने सादर केलेल्या संरचनात्मक (स्ट्रक्चरल ऑडिट ) स्थिरता अहवालाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. एप्रिल २०२५ मध्ये सादर झालेल्या या अहवालात संबंधित इमारत अत्यंत असुरक्षित असल्याचे नमूद केले असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ती तातडीने रिकामी करणे आवश्यक असल्याची शिफारस करण्यात आली आहे.

पणजी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील २० इमारतींना असुरक्षित आणि धोकादायक घोषित करण्यात आले आहे. यातील किमान दोन इमारती पावसाळ्यापूर्वी पाडण्यात येणार असल्याची माहिती समोर आली होती.

पणजी आणि रायबंदर परिसरातील दोन इमारतींबाबतचा तांत्रिक अहवाल आमच्याकडे प्राप्त झाला आहे. संबंधित रहिवाशांना आम्ही नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. या इमारती धोकादायक असल्याचे स्पष्ट झाले असून त्यांना पाडणे आवश्यक आहे. सुरुवातीला १२ इमारतींची यादी होती, परंतु आता आणखी काही इमारती जोडल्या गेल्याने ही संख्या २० वर पोहोचली आहे, अशी माहिती एका महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने दिली.

महानगरपालिकेने गेल्या वर्षी गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाला पत्र देत राजधानी शहरातील १२ जीर्ण इमारतींच्या संरचनात्मक स्थिरतेचा अभ्यास करण्याची विनंती केली होती. यानुसार अभियांत्रिकी महाविद्यालयाने तपासणी करून अहवाल सादर केला आणि काही इमारती अत्यंत असुरक्षित असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे त्या इमारतींवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

१७ ऑगस्ट २०२४ रोजी सांत इनेझ भागात झालेल्या मुसळधार पावसानंतर एक रिकामी इमारत अंशतः कोसळली होती. त्यानंतर सीसीपीने तात्काळ पावले उचलली. महापौर रोहित मोन्सेरात आणि उत्तर गोव्याच्या तत्कालीन जिल्हाधिकारी स्नेहा गिट्टे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली होती.

या पाहणीनंतर महापौर मोन्सेरात यांनी स्पष्ट केले होते की, शहरातील अन्य जीर्ण इमारतींचा स्ट्रक्चरल अहवाल मागवण्यात येईल. तसेच, संबंधित यंत्रणांचा अहवाल आणि जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश प्राप्त झाल्यानंतरच आवश्यक इमारती पाडण्यात येतील.

त्यांनी यावेळी सांगितले होते की, महानगरपालिका गोवा अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा सरकारी पॉलिटेक्निक, अल्तिन्हो यांना पत्र पाठवून इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगेल.




पायाभरणी सोहळा

नवीन झुआरी पुलावर वेधशाळा मनोरे आणि नेत्रदिपक दृश्ये पाहण्याच्या गॅलरीज

प्रकल्पाचे फायदे

• पर्यटनाला चालना
• आर्थिक क्रियाकलाप
• देशाची पर्यटन राजधानी म्हणून गोव्याचा विकास करणे.
• पॅरीसच्या आयफेल टॉवरच्या धर्तीवर नेत्रदिपक दृश्ये पाहण्याच्या गॅलरीज.

शुक्रवार २३ मे २०२५ रोजी I संध्या. ५.०० वा. I स्थळ : चिखली ग्रामपंचायत सभागृह

यांच्या शुभहस्ते
श्री. नितीन गडकरी
(मान. केंद्रीय रस्ता वाहतूक व महामार्ग मंत्री)

कार्यक्रम अध्यक्ष
डॉ. प्रमोद सावंत
(मान. मुख्यमंत्री, गोवा)

यांच्या सन्माननीय उपस्थितीत
श्री. श्रीपाद नाईक
(मान. केंद्रीय ऊर्जा आणि नवीन व नवकरणीय ऊर्जा मंत्री)
श्री. माविन गुदिन्हो
(मान. वाहतूक मंत्री, गोवा)

श्री. सदानंद शेट तानवडे (मान. खासदार, राज्यसभा)
कॅप्टन विरीयातो फर्नांडिस (मान. खासदार, लोकसभा)
श्री. आंतोनिओ वाझ (मान. आमदार, कुठ्ठाळी मतदारसंघ)
श्री. वीरेश बोरकर (मान. आमदार, सांत आंद्रे मतदारसंघ)
श्री. कृष्णा साळकर (मान. आमदार, वास्को मतदारसंघ)
श्री. संकल्प आमोणकर (मा. आमदार, मुरगाव मतदारसंघ)